(फक्त कार्यालयीन उपयोगासाठी)

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

## तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन २०१२-१३ करीताचा अलग लेखा अहवाल

## (मराठी आवृत्ती)

तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव

**नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव चा दिनांक 31/03/2013 अखेर केलेला अलग लेखा अहवाल**

**प्रस्तावना-**

(1) नियंत्रक व महालेखापरिक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवेच्या शर्ती) अधिनियम-1971 मधील कलम क्र-19(3) तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम-1997 अन्वये तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या दिनांक 31/3/2013 रोजीच्या ताळेबंदाचे तसेच प्रकल्प विकास लेखा परिक्षण आम्ही केले आहे. सदरच्या वित्तीय प्रपत्रात तापी पाटबंधारे विकास महामंडळाचे 1 प्रादेशिक कार्यालय, 2 मंडळ कार्यालये, 11 विभागीय कार्यालये व 58 उपविभागीय कार्यालये यांच्या लेख्यांचा समावेश आहे. वार्षिक लेखे ही महामंडळाची जबाबदारी आहे. आम्ही केलेल्या लेखा परिक्षणावर आधारित वार्षिक लेख्यांवर मत व्यक्त करण्याची जबाबदारी आमची आहे.

(2) लेखांकना संबंधीत वर्गीकरण, खात्रीकरण तसेच सुयोग्य लेखांकन पद्धती, मानके व लेखे ठेवणे विषयक पद्धती इ. वर भारताचे नियंत्रक व महालेखाकार यांचे शेरे, अलग लेखा परिक्षा अहवालात समाविष्ट करण्यात आलेली आहेत. विहित कायदे, नियम, विनियम (प्राधान्यता व नियमितता) आणि परिणाम तथा कार्यक्षमतेबाबतची मते इ. अनुसरुन आर्थिक व्यवहारांच्या लेखा परिक्षणातील शेरे स्वतंत्ररित्या निरीक्षण अहवालाद्वारे वा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या लेखा परिक्षण अहवालाद्वारे कळविण्यात आलेली आहेत.

(3) भारतात सर्वसाधारणपणे स्विकृत करण्यात आलेल्या लेखा परिक्षणाचे मानकानुसार आम्ही लेख्यांचे लेखा परिक्षण केले आहे. वार्षिक लेखे हे सर्वसाधारणपणे दोष रहित असल्याची खात्री पटविण्यासाठी मानकानुसार आम्ही नियोजन व लेखा परिक्षण करावे असे या मानकानुसार अपेक्षित आहे. सदरचे लेखा परिक्षण हे लेखे व त्या पृष्ठ्यर्थ जोडलेली सोबतची वित्तीय विवरणे, कागदपत्रे या आधारे केलेले आहे. लेखा परिक्षणात व्यवस्थापने विचारात घेतलेली लेखांकनाची मुलतत्वे, लेखांकनाची विवरणपत्रे, तक्ते, लेख्यांचे सादरीकरण इ. बाबी विचारात घेतलेल्या आहेत. आम्हास विश्वास आहे की, आम्ही व्यक्त करीत असलेल्यास मतांना आम्ही केलेल्या परिक्षण पुरेसा आधार होऊ शकतो. लेखा परिक्षणाचे मत देतांना सर्वकष बाबींच्या आधारे निर्णय घेण्यात आलेला आहे.

(4) आम्ही केलेल्या लेखा परिक्षणाचे आधारे आम्ही अहवाल सादर करतो की,

(i) आमच्या ज्ञानानुसार व विश्वासानुसार लेखा परिक्षणाकरीता आवश्यक असलेली सर्व प्रकारची माहिती तथा स्पष्टीकरणे आम्ही प्राप्त केली आहे.

(ii) तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम-1998 च्या क्र-IV मधील कलम-47(1) मध्ये महामंडळाने मान्य केलेल्या नमुन्यात ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तयार करण्यात आलेले आहे.

(iii) तापी पाटबंधारे विकास महामंडळाने अधिनियम क्र-4 च्या नियम-1998 मधील कलम-47(1) नुसार योग्य ती लेखा पुस्तके व संबंधीत आवश्यक असलेली सर्व संबंधीत अभिलेखे योग्य रित्या ठेवलेली आहे, असे आमचे मतानुसार व आम्ही तपासणी केलेल्या लेख्यातून दिसून आहले आहे.

**आम्ही पुढील अहवाल देत आहोत.........**

## प्रकल्प विकास लेखा-

### अ) उत्पन्न

**अ-1 सुरक्षा अनामत रक्कम व व्याज अदा करण्यासाठी प्राप्त निधी (परिशिष्ट क्र. 9)**

**अल्पमुदत ठेव रु. 0.84 कोटी.**

यामध्ये महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदाना व्यतिरिक्त बँकेच्या जमा रकमेवरील आणि कंत्राटदारास दिलेल्या आगाऊ उचलीवरील व्याज हे "महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या भांडवली अंशदान" (परिशिष्ठ क्र.1 मध्ये) "दायित्व" म्हणून दर्शविणे आवश्यक होते. त्याचा परिणाम महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेले दायित्व भांडवली अंशदान परिशिष्ठ क्र.1 मध्ये कमी दर्शविण्यामध्ये झाला आहे. त्यामुळे अनुदान व रु. 0.84 कोटी उत्पन्न जास्त दर्शविण्यात आला आहे. या अनुषंगाने निव्वळ तूट (तोटा) ही त्या वर्षाकरिता त्या प्रमाणात कमी दर्शविण्यात आली आहे.

**ताळेबंद**

### ब- दायीत्व

**ब-1 महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त भांडवली अंशदान (परिशिष्ट क्र.1) रु.7874.47 कोटी.**

**ब-1.1 सन 2012-13 मधील भांडवली अंशदान रु.300.89 कोटी.**

परिशिष्ट क्र. 1 नुसार शासनाकडून जे रु. 29.16 कोटी आदिवासी अनुदान म्हणुन प्राप्त झाले होते ते आदिवासी अनुदान या लेखा शिर्षाखाली दर्शविणे आवश्यक होते तथापि ते सद लेखा शिर्षाखाली न दर्शविले गेल्याने ते भाग भांडवली अशंदानामध्ये दर्शविल्यामुळे भाडंवली अनुदान रु. 29.16 कोटींनी जास्त दिसून येते व आदिवासी लेखा शिर्षाखाली अनुदान रु.29.16 कोटींनी कमी दिसुन येते.

**ब-1.2 आरंभिची शिल्लक रु. 3177.22 कोटी**

या मध्ये सन 2002-2003 ते 2005-2006 पर्यंत महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय समिती मर्यादीत (MPVCL) कडून प्राप्त रु. 20.51 कोटी हे सुरक्षीत दर्शविणे आवश्यक होते. तथापि रु.20.51 कोटी वरील देय व्याजाच्या रकमेच्या दायीत्याबाबत शासनाकडून जो पर्यंत मार्गदर्शक सुचना प्राप्त होत नाही तो पर्यंत सदर रक्कम रु. 20.51 कोटी वरील देय व्याजाच्या रकमेबाबत खात्री करुन घेता येत नाही.

**ब-2 चालू दायीत्व व तरतूदी (परिशिष्ट क्र.3) रु. 229.60 कोटी.**

**ब-2.1 हमी शुल्काबाबत तरतूद न करणेबाबत रु. 23.84 कोटी**

तापी पाटबंधारे विकास महामंडळाने सन 1998-1999 ते 2002-2003 या कालावधीत (मालिका क्र.1 ते 6) साठी खाजगी संस्थांकडून रु. 1299.84 कोटी रकमेचे कर्ज रोखे वेळो-वेळी शासनाने दिलेल्या हमी नुसार उभारलेले आहेत. सदर हमी 2% प्रती वर्ष या दराने व दंडनीय व्याज 16 ते 24 % प्रती वर्ष दराने शासनास देय असलेल्या रु. 23.84 कोटी च्या लेख्यात समाविष्ट केलेला नाही. त्यामुळे दायीत्व (परिशिष्ट क्र.3) मध्ये व प्रशासकीय बाबींवरील खर्च (परिशिष्ट क्र.8) मध्ये रु. 23.84 कोटी कमी दर्शविण्यात आलेले आहेत.

**ब-2.2 सार्वजनिक बांधकामे अनामत रक्कम (परिशिष्ट क्र.3) रु. 104.32 कोटी.**

दिनांक 31/3/2013 रोजी संपलेल्या एकत्रीत मासिक लेख्यात रु. 59.00 कोटी सार्वजनिक बांधकाम अनामत या लेखाशिर्षाखालील दर्शविण्यात आलेले आहेत. तथापि ताळेबंदात रु. 104.32 कोटी दर्शविण्यात आलेले आहेत. सदर बाबीस समायोजित करणे आवश्यक आहे.

**ब-2.3 (अ) विभाग आणि महालेखाकार (WMR) यांच्यातील समायोजन लेखा रु.37.50 कोटी.**

**(ब) महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त व वसुली रकमांचा समायोजन लेखा रु. 8.70 कोटी.**

वरील बऱ्याच कालावधी पासून प्रलंबीत दायित्व लेखा शिर्षाखाली दर्शविण्यात आलेल्या बाबींचा 13 वर्षा पेक्षा जास्त कालवधी लोटून गेला तरी ही निपटारा करण्यात आलेला नाही व महामंडळाने प्रत्यक्ष मुल्यापन करुन अंतिम निपटरा केलेला नाही.

**ब-2.4 साहित्य खरेदी निलंबन लेखा रु. 16.55 कोटी.**

सामग्री खरेदी निलंबन शिर्षाखाली रु. 16.55 कोटी असमायोजित आहे. ज्याची फेरजुळणी करण्यात आलेली नाही. तरीही त्याचा कालावधीनुसार विभागणी व वास्ताविक दायित्व सामग्री खरेदी निलंबन लेख्यानुसार त्या-त्या शिर्षाखाली समायोजन करण्यात आलेले नाही.

**ब-2.5 संक्रमणाव्यस्थेतील भरणा रु. 3.96 कोटी.**

संक्रमणाव्यस्थेतील रकमांचे योग्य त्या लेखा शिर्षाखाली समायोजन न करण्यात आल्याने सदर रकमांबाबत खात्री करुन घेता येत नाही.

**क-	मालमत्ता**

**क-1	स्थिर मालमत्ता (परिशिष्ठ क्र.4) रु. 7586.92 कोटी...**

**अ)** महामंडळाची दिनांक 31 मार्च-2013 अखेर पूर्ण झालेल्या प्रकल्पांची स्थिर मालमत्ता (निश्चित रक्कम ठरवता येत नाही) आणि इतर घसारा होणारी स्थिर मालमत्ता रक्कम रु.18.43 कोटी इतकी आहे. तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव च्या कालद्यातील कलम-44 अन्वये स्थिर मालमत्तेसाठी घसारा निधीची तरतूद करणे आवश्यक होते. तथापी सदर निधीची तरतूद केलेली नाही. याचा परिणाम स्थिर मालमत्ता जादा आणि निव्वळ तूट कमी दर्शविण्यात आली आहे. (परिशिष्ट क्र.4) घसारा दर (मूल्य) ज्या कारणासाठी काढला आहे ते दिल्याशिवाय याबाबत परिमाणकता काढता येणार नाही.

**ब)** तापी पाटबंधारे विकास महामंडळाची एकूण मालमत्ता यामध्ये दर्शविलेली स्थिर मालमत्ता रक्कम रु. 2046.73 कोटी ही दिशाभूल करणारी आहे. कारण यामध्ये (अ) महामंडळ स्थापने वेळी पूर्ण झालेले 216 प्रकल्प महामंडळाकडे हस्तांतर झाले होते. त्यानंतर लगेच सदर पूर्ण झालेले प्रकल्प महाराष्ट्र शासनाच्या व्यवस्थापन विभागाकडे पुर्नहस्तांतर करण्यात आले होते. त्याचे मूल्य दर्शविले आहे. आणि (ब) जे विभाग पूर्वी महामंडळांतर्गत कार्यरत होते परंतु आता महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणखाली कार्यरत आहेत. अशा विभागाचे मालमत्ता व दायित्व यात दर्शविले आहे. याचे समायोजन करणे आवश्यक आहे.

**क)** रु. 427.97 कोटी स्थिर मालमत्ते मध्ये प्रकल्पांचे कामांसाठी प्रलंबीत रक्कम रु.420.90 कोटी दर्शविली आहे आणि वर्षा मधील निव्वळ तूट रु. 7.96 कोटी दर्शविली आहे. सदर रकमेची (स्थिर मालमत्ता) विविध प्रकल्पांवर विभागणी महामंडळाने केलेली नाही. सदर रकमेची विभागणी न केल्यामुळे स्थिर मालमत्तेची मर्यादेपर्यंत कमी व महामंडळ स्थापनेनंतर शासनाकडे हस्तांतर झालेल्या प्रकल्पांतील स्थिर मालमत्तेचे मूल्य तसेच राहिल्यामुळे सदर रकमेत तफावत निर्माण झाली.

**क-2	सद्यस्थितीतील मालमत्ता, कर्ज आणि अग्रीम (परिशिष्ठ क्र.5)**

**क-2.1 संकिर्ण सार्वजनिक बांधकाम अग्रिम (परिशिष्ठ क्र.5(ब) - रु.74.41 कोटी....**

अ) दिनांक 31 मार्च-2013 च्या एकत्रित मासिक लेख्यानुसार रु. 70.96 कोटी इतकी रक्कम संकीर्ण सार्वजनिक बांधकाम अग्रीम या शिर्षाखाली दर्शविली आहे. तथापि ताळेबंदानुसार ही रक्कम रु.74.41 कोटी दर्शविली आहे. याचे समायोजन आवश्यक आहे.

ब) अग्रीमांचा कालावधी व दर्शविलेला संशायास्पद खर्चाचा योग्य तपशिल दिलेला नाही अथवा त्यांचे निराकरण अथवा समायोजन करण्यांत आलेले नाही.

**क-2.2 रोख समायोजन निलंबन लेखा (परिशिष्ट क्र.5 (ब) रु. 9.08 कोटी...**

**अ**) रु. 9.08 कोटी रकमेचा निलंबन लेखा निधीचे समायोजन करणे बऱ्याच कालावधी पासुन प्रलंबीत आहे. त्याची कालावधीनुसार विभागणी करण्यात यावी. तसेच चुकीचे व संशायास्पद भाग दर्शवून त्याचे समायोजन करण्यात आलेले नाही. अथवा ते वगळण्यात आलेले नाही.

**ब**) दिनांक 31 मार्च 2013 च्या एकत्रित मासिक लेख्यानुसार रु. 5.43 कोटी इतकी रक्कम रोख समायोजन निलंबन लेखा या शिर्षाखाली दर्शविण्यात आलेली आहे. तथापी ताळेबंदानुसार रु. 9.08 कोटी दर्शविलेली आहे त्याचे समायोजन आवश्यक आहे.

**क-2.3 महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळा मधील अनामत ठेवी रु. 5.00 कोटी....**

रु.5.00 कोटी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे अनामत ठेव म्हणुन दर्शविण्यात आलेली आहे. तथापि महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सन 2012-2013 च्या लेख्यानुसार ही रक्कम रु. 7.39 कोटी दर्शविण्यात आलेली आहे. याचे समायोजन करणे आवश्यक आहे.

**क-2.4 संक्रमणावस्थेतील पतपत्रे (LOC) (परिशिष्ट क्र.5 (ब))- रु.3.94 कोटी...**

रु. (-) 3.94 कोटी पतपत्र मर्यादेची समायोजन न झाल्याने तफावत आढळून आली याबाबत योग्य ते समायोजन करुन योग्य दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

**ड- लेखा टिप्पणी (परिशिष्ट क्र.10)**

**ड-1 वेतनाचे अनुदान लेखा टिपणीत दर्शविलेले नाही....**

जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांनी सन 2012-13 करिता वेतना पोटी एकूण रु. 47.15 कोटीचा निधी महामंडळास वितरीत केला आहे. तथापि महामंडळाने त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र जलसंपदा विभागास सादर केलेले नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती लेखा टिप्पणी (परिशिष्ट क्र.10) मध्ये दर्शविण्यात यावी.

**ड-2 सन 2008-2009 पासूनचा अखर्चीत निधी रु. 14.70 कोटी...**

सिंचन प्रकल्पांच्या विशेष भूसंपादनापोटी महाराष्ट्र शासनाचा भाग भांडवली अंशदान म्हणून प्राप्त झालेला रु. 14.70 कोटीचा निधी सन 2008-09 पासून खर्च झालेला नसल्याचे दर्शविले आहे. ही बाब लेखा टिपणीत नोंदविण्यात आलेली नाही.

**ड-3 कालबाह्य झालेले धनादेश न दर्शविणे बाबत .....**

दिनांक 31/03/2013 अखेर रु. 14.53 कोटी रकमेचे 492 कालबाह्य झालेले धनादेश महामंडळाच्या अखत्यारीतील विभागांच्या मासिक लेख्यांमध्ये दर्शविलेले आहेत असे असले तरीही महामंडळाने सदर रकमा किरकोळ देणे मध्ये ही दर्शविल्या नाहीत अथवा ही बाब लेखा टिपणीत ही नोंदविण्यात आलेली नाही.

**ड-4 सहाय्यक अनुदान...**

सन 2012-13 या आर्थिक वर्षात महामंडळास रु. 819.21 कोटी (आरंभीची शिल्लक रु. 326.08 कोटी धरुन) इतके रकमेचे सहाय्यक अनुदान प्राप्त झालेले होते. त्यापैकी रु. 508.69 कोटी इतके अनुदान खर्ची पडले असुन रु. 310.52 कोटी इतके अनुदान दिनांक 31/03/2013 अखेर अखर्चीत आहेत. सदर बाबी लेख्यांत व्यवस्थीत दर्शविण्यात आलेल्या नाहीत.

उपरोक्त परिच्छेदांमध्ये दिलेल्या अभिप्रायास अधिन राहून प्रमाणित करण्यात येते की, ताळेबंद तसेच प्रकल्प विकास लेखे हे ठेवण्यात आलेल्या लेखांकन पुस्तकाशी सुसंगत आहे.

आमच्या मते तसेच आम्हांस सादर करण्यात आलेली माहिती व स्पष्टीकरणे या आधारे वार्षिक लेखे, लेखांकन विषयक पध्दती व लेखापरिक्षणाचे अनुसूची मध्ये दिलेल्या माहितीनुसार प्रमाणित करण्यात येते की, भारतातील सर्वसाधारण स्विकृत लेखा लेखांकन पध्दतीनुसार लेखे ठेवण्यात आलेले आहेत. तसचे प्रमाणित करण्यात येते की, लेखे सत्य तथा योग्य माहिती दर्शवितात.

सदरचे अभिप्राय हे तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचे दिनांक 31/03/2013 रोजीच्या ताळेबंदास लागु आहेत. सदचे अभिप्राय महामंडळाचे त्या तारखेचे वर्ष अखेरचे प्रकल्प विकास लेखे व त्यावरील तुट यांना सुध्दा लागू आहेत.

नियंत्रक व महालेखाकार यांचेकरिता

सही xxx

**महालेखापाल**

परिशिष्ट-1 तपासणी अहवाल

1. ***अंतर्गत तपासणी पध्दतीची समाधानकारता.***

अंतर्गत तपासणी पध्दत समाधान कारक असून त्यावर कोणतेही भाष्य नाही.

2. ***अंतर्गत नियंत्रण पध्दतीची समाधानकारकता.***

महामंडळांतर्गत एक प्रादेशिक कार्यालय, दोन मंडळ कार्यालये, 11 विभागीय कार्यालयं तसेच 58 उपविभागीय कार्यालये कार्यरत आहेत. दरमहाचे मासिक लेखे (Monthly Accounts) विभागीय कार्यालयाकडून महामंडळ कार्यालयास प्राप्त होतात व महामंडळ कार्यालयात नियमितपणे त्यांचे एकत्रिकरण करण्यांत येते. विभागीय कार्यालयाच्या मासिक लेख्यातील आकडेवारी व महामंडळ कार्यालयात उपलब्ध आकडेवारीचा ताळमेळ ठराविक कालावधीत करण्यांत येत असून मंडळ कार्यालय व विभागीय कार्यालयीन स्तरावरील समायोजनाचे काम प्रगतीपथावर आहे. महामंडळाच्या कामाचा विस्तार लक्षात घेता अंतर्गत नियंत्रण पध्दतीत अजून सुधारणा करण्यास वाव आहे.

3. ***स्थावर मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी पध्दत.***

अ) प्रत्येक प्रकल्पाचा उपशिर्षवार (शिर्ष कामे, कालवा कामे, भुसंपादन, पुनर्वसन इ) दिनांक 31/3/2013 अखेर झालेल्या खर्चाची नोंदवही (रजिष्टर) महामंडळाने ठेवलेली नाही.

ब) धरण, कालवा व वितरण व्यवस्था तसेच यंत्रसामुग्री चे प्रत्यक्ष तपासणीची (Physical Verification) नोंद विहित पध्दतीने व्यवस्थित ठेवण्यात आली आहे. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर माहे मे, नोव्हेंबर व डिसेंबर मध्ये पूर्ण झालेल्या बांधकामांची प्रत्यक्ष तपासणी कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांनी केल्याबाबत नोंद दिसून येत नाही.

4. ***यंत्रसामुग्री, संग्रहावरील साहित्य यांची यादी करुन त्यांचे प्रत्यक्ष तपासणीची पध्दत...***

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम संहितेनुसार महत्त्वाचे संग्रह साहित्य, यंत्रसामुग्री यांची प्रत्यक्ष मोजणी उपविभागीय अधिकाऱ्यांने केली पाहिजे. तसेच अधीक्षक अभियंता यांनी अन्य विभागातील अधिकाऱ्यांची नेमणूक इतर दुसऱ्या विभागातील संग्रह साहित्य तपासणीकरिता केली पाहिजे. अशा प्रकारे तपासणी केल्याबाबत कोणताहीअहवाल अथवा माहिती महामंडळ कार्यालयात नाही यामुळे अंतर्गत नियंत्रणात कमतरता दिसून येते.

5. ***संविधानिक (Statutory) देणी नियमितपणे अदा करणेबाबत....***

आयकरा सारखी सर्व प्रकारची वसुली नियमित दराने महामंडळामार्फत करण्यांत येते. अशा वसुलीची अदायगी महामंडळ कार्यालयाने संबंधित खात्यात निर्बंधित कालावधीत केली पाहिजे.

सही xxxx

**लेखाधिकारी**
**आर्थिक विभाग-1**

(एस. एम. भर्ड)
**व्यवस्थापकीय संचालक**
तापी पाटबंधारे विकास महामंडळ,
जळगांव

**कार्यकारी संचालक**
तापी पाटबंधारे विकास महामंडळ,
जळगांव

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचे सन 2012-13 या आर्थिक वर्षातील अलग लेखा परिक्षण अहवालावरील अनुपालन

**********************

## प्रकल्प विकास लेखा

**अ) उत्पन्न-**

**अ-1 सुरक्षा अनामत रक्कम व व्याज अदा करण्यासाठी प्राप्त निधी (परिशिष्ठ-9)**

**अल्पमुदत ठेवीवरील व्याज- रु. 0.84 कोटी**

रु.0.84 हे नॉन-ऑपरेटिव्ह खात्यामधील कंत्राटदारांची सुरक्षा अनामत रक्कम व इतर संकीर्ण महसूली रकमा स्थानिक संस्थाकर अल्पमुदत ठेवीत गुंतवून त्यापासून मिळालेले व्याज दर्शविण्यात आलेले आहे. म्हणून रु.0.84 कोटी अनुदानात समाविष्ट केलेले नाही. परंतू ते देखील प्रकल्पावरील जमा म्हणून आयकर विभागानेही मान्य केले असून प्रकल्पावर खर्च करण्यात येतात.

## ताळेबंद

**ब) दायित्व-**

**ब-1 महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त भांडवली अंशदान-रु.7874.47 कोटी (परिशिष्ट-1)**

**ब-1.1 सन 2012-13 मधील भांडवली अंशदान- रु. 300.85 कोटी.....**

चुकून रु.21.1604 कोटी इतकी रक्कम आदिवासी अनुदानाऐवजी महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त भांडवली अंशदानाखाली दर्शविण्यात आलेली आहे. सदर बाबीची नोंद आर्थिक वर्षात दुरुस्ती करुन करण्यात येईल.

**ब-1.2 आरंभिची शिल्लक- रु.3177.22 कोटी**

मागील वर्षी महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय महामंडळ मर्यादित (MPVC) यांचेकडून सन 2002-03 ते 2005-06 या वर्षात अनुदान प्राप्त झालेले होते. तथापी महाराष्ट्र शासनाकडून सदर रकमा कोणत्या शिर्षाखाली नोंदविण्यात याव्यात याबाबत योग्य ते मार्गदर्शन प्राप्त न झाल्याने सदर रकमा महामंडळाच्या लेखा पुस्तकात अनुदान या शिर्षाखाली नोंदविण्यात आलेल्या आहेत. सुरक्षित कर्जे (परिशिष्ट-२) या शिर्षाखाली नाही.

महामंडळाचा वरील बाबत शासनाशी पत्रव्यवहार चालू आहे. शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

**ब-2 चालू दायित्व व तरतूदी (परिशिष्ट-3)- रु.229.60 कोटी**

**ब-2.1 हमी शुल्कबाबत तरतूद न करणेबाबत- रु.23.84 कोटी**

या महामंडळाचे लेखे हे रोखीच्या पद्धतीने ठेवले जातात. त्यानुषंगाने जेव्हा जेव्हा ज्या रकमेसाठी अनुदान प्राप्त होते तेव्हा त्या रकमेसाठी लेख्यात नोंदी घेण्यात येतात.

यापूर्वी शासन आदेश क्र- BGM/64.07/(107/2009)/Finance-I, Dated 26/03/2009 अन्वये हमी शुल्काबाबत शासनाने समायोजनाद्वारे हमी शुल्काची रक्कम दिली ती महामंडळाच्या लेख्यात दर्शविण्यात आलेली होती. परंतू त्यानंतर याबाबत शासनाकडून या कार्यालयास सुचना अद्याप प्राप्त झालेल्या नाहीत.

**ब-2.2 सार्वजनिक बांधकामे अनामत रक्कम (परिशिष्ठ क्र.3)- रु.104.32 कोटी**

एकत्रित मासिक लेख्यात सार्वजनिक बांधकामे अनामत रक्कम या शिर्षाखाली दर्शविण्यात आलेले रु.58.95 कोटी ही महामंडळांतर्गत कार्यरत विभागीय कार्यालयांची एकूण रक्कम आहे. तथापी ताळेबंदात दर्शविण्यात आलेली रक्कम यापूर्वी महामंडळांतर्गत परंतू आता शासनाकडे पुर्नहस्तांतरीत झालेल्या विभागांची एकूण रक्कम आहे.

हस्तांतरीत झालेल्या विभागांच्या शिल्लक रकमांबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर रकमांबाबत संबंधीत विभाग प्रमुखांकडून खात्री करुन तसे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्या रकमा शासनाकडे पुर्नहस्तांतरीत करण्यात येतील.

**ब-2.3 अ) विभाग आणि महालेखाकार (WMR) रकमांचा समायोजन लेखा- रु.37.50 कोटी**

**ब) महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त व वसूली रकमांचा समायोजन लेखा- रु.8.70 कोटी**

वरील प्रलंबित शिल्लक रकमांबाबत संबंधीत मंडळ / विभागीय कार्यालयांकडून आवश्यक त्या माहितीची मागणी करण्यात आलेली आहे. तसेच त्याबाबत आवश्यक त्या सुचनासुद्धा देण्यात आलेल्या आहेत.

**ब-2.4 साहित्य खरेदी निलंबन लेखा- रु.16.55 कोटी**

संबंधीत विभागांना जून्या रकमांची पडताळणी करुन व वर्षनिहाय निश्चीत करुन त्यांचे समायोजन करण्याबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. विभागांच्या अंतर्गत लेखा परिक्षण अहवालात कालावधीनुसार विभागणी करुन दिलेली आहे.

**ब-2.5 संक्रमणावस्थेतील भरणा- रु.3.96 कोटी**

यात मंडळ / विभागीय कार्यालये ऑपरेटिव्ह आणि नॉन-ऑपरेटिव्ह खात्यातून महामंडळास जमा करत असलेल्या रकमांचा समावेश आहे. सदर रकमांबाबत समायोजनाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर रकमांची पडताळणी झाल्यानंतर त्यांचा परिमाण लेखा पुस्तकात दर्शविण्यात येईल.

**क) मालमत्ता-**

**क-1 स्थिर मालमत्ता (परिशिष्ठ क्र.4)- रु.7586.92 कोटी**

**घसारा-**

नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या संमतीने जलसंपदा विभागाने अद्यापपर्यंत घसाऱ्याचे दर निश्चित केलेले नाहीत. घसाऱ्याचे दर निश्चित केल्यानंतर या महामंडळाच्या स्थिर मालमत्ते वरील घसाऱ्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

तसेच हे ही खरे आहे की, परिशिष्ट-4 मध्ये दर्शविलेली रक्कम रु.2046.73 कोटीची मालमत्ता महाराष्ट्र शासनाकडून महामंडळास वर्ग करण्यात आलेली आहे. या वर्ग केलेल्या व त्या व्यतिरिक्त असलेले व पूर्ण झालेले प्रकल्प शासनाकडे वर्ग करण्यात आलेले आहे. अशा प्रकल्पांबाबत आवश्यक ते समायोजनाचे काम प्रगतीपथावर आहे व त्याबाबत संबंधीत विभागांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर बाबींची पडताळणी झाल्यानंतर त्याचा परिमाण महामंडळाच्या आर्थिक विवरणपत्रात दर्शविण्यात येईल.

वर्ष अखेरीस झालेल्या तोट्याचे हस्तांतरीकरण प्रकल्पाच्या किंमतीत वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदरचा खर्च अपूर्ण व पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या खर्चात पडताळणीनंतर वर्गीकरण करण्यात येईल.

**क-2 सद्यस्थितीतील मालमत्ता कर्ज आणि अग्रिम- (परिशिष्ठ क्र.4)**

**क-2.1 संकीर्ण सार्वजनिक बांधकाम अग्रिम (परिशिष्ट-5(6))- रु.74.41 कोटी**

ताळेबंदात दर्शविण्यात आलेली रक्कम ही देखभाल व दुरुस्ती विभाग जे शासनाकडे पुर्नहस्तांतरीत करण्यात आलेले आहे त्यांची मिळून आहे. सदर रकमांबाबत समायोजनाची कार्यवाही सुरु आहे. त्याची वर्षनिहाय पडताळणी झाल्यानंतर त्याचा परिणाम आर्थिक विवरणपत्रात दर्शविण्यात येईल.

**क-2.2 रोख समायोजन निलंबन लेखा (परिशिष्ट-5(ब))- रु.9.08 कोटी**

**(अ)** प्रलंबित शिल्लक रकमांबाबत कालावधीनुसार विभागणी ही त्या संबंधीत विभागांच्या अंतर्गत लेखा परिक्षण अहवालात करण्यात आलेली आहे.

**(ब)** ताळेबंदात दर्शविण्यात आलेल्या शिल्लक रकमा या, जे विभाग शासनाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत त्यांच्या मिळून आहे. सदर रकमांची पडताळणी तसेच समायोजन झाल्यानंतर त्या रकमा महाराष्ट्र शासनाकडे वर्ग करण्यात येतील.

**क-2.3 महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडील अनामत ठेव- रु.5 कोटी**

महामंडळाचे लेखे हे रोखीच्या पद्धतीने ठेवले जातात म्हणून वरील ठेवी व त्यावर प्राप्त व्याज सन 2013-14 या आर्थिक वर्षात दर्शविण्यात आलेले नाही. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून प्राप्त ठेव रु.5.00 कोटी व त्यावरील व्याज रु.2.39 कोटी हे ज्या वर्षात प्राप्त झालेले आहे त्या वर्षात उत्पन्न म्हणून दर्शविण्यात आलेले आहे.

**क-2.4 संक्रमणावस्थेतील पतपत्रे (LoC) (परिशिष्ट-5(ब))- रु.3.94 कोटी**

यात महामंडळाकडून मंडळ/विभागीय कार्यालयांना वर्ग केलेल्या रकमांचा समावेश आहे. याबाबत आवश्यक त्या समायोजनाची कार्यवाही चालू आहे. सदर रकमांची पडताळणी झाल्यानंतर त्याचा परिणाम लेखा पुस्तकात दर्शविण्यात येईल.

**ड- लेखा टिपणी (परिशिष्ट-10)**

**ड-1 वेतनाचे अनुदान लेखा टिपणीत दर्शविलेले नाही-**

महामंडळ प्रत्येक महिन्याला सर्व प्रकारच्या खर्चाचे (वेतनाच्या खर्चासह) विवरणपत्र सादर करीत असल्याने अशा कामांसाठी स्वतंत्र उपयोगिता प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

**ड-2 सन 2008-09 पासूनाचा अखर्चित निधी- रु.14.70 कोटी**

यापूर्वी भूसंपादनाचे पैसे अदा करण्यासाठी प्राप्त झालेला निधी अशा शिर्षाखाली नोंदविलेला आहे आणि प्राप्त निधीतून तो संबंधीत विभागांना वितरीत केलेला आहे. त्यामुळे सदर निधीतून रक्कम अखर्चित नाही.

**ड-3 कालबाह्य झालेले धनादेश न दर्शविणेबाबत-**

कालबाह्य झालेल्या धनादेशांबाबतची वस्तुस्थिती मंडळ / विभागीय कार्यालयांच्या अंतर्गत लेखा परिक्षण अहवालानुसार केलेली आहे म्हणून सदर बाब लेखा टिपणीत नमूद केलेली नाही. याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत मंडळ / विभागांना सुचना देण्यात आलेल्या ओहत.

इ-4 सहाय्यक अनुदान-

अनुदान वितरीत करण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

1) अनुदान वर्षाच्या शेवटी प्राप्त झाले.

2) शेतकऱ्यांनी प्रकल्पांसाठी जमिन देण्यास नकार दिल्याने.

3) शेतकऱ्यांचे पुनर्वसन.

4) संबंधीत प्राधिकाऱ्यांकडील प्रलंबित मंजूरीमुळे.

5) वनविभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे.

सदर बाब पुढील आर्थिक विवरणपत्रात लेखा टिपणीत दर्शविण्यात येईल.

कार्यकारी संचालक
तापी पाटबंधारे विकास महामंडळ,
जळगांव

(एस. एम. गवई)
व्यवस्थापकीय संचालक
तापी पाटबंधारे विकास महामंडळ,
जळगांव

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव

## लेखा परिक्षण अहवालास जोडलेली अनुसूची

**(१) अंतर्गत लेखा परिक्षण पद्धतीचे यथार्थतेबाबत-**

अभिप्राय निरंक

**(२) अंतर्गत नियंत्रण पद्धतीने यथार्थतेबाबत-**

महामंडळाच्या लेखा संकलनाचे काम तसेच विभागीय लेख्यांचे तपासणीचे काम मे.माने, शिंदे आणि वेगाद, सनदी लेखा लेखापाल, मुंबई यांना सोपविण्यात आले आहे. त्यांचे लेखा परिक्षण पथक विभागीय कार्यालयांना भेटी देऊन करीत आहेत. तसेच विभागांकडून प्राप्त होणारे लेख्यांचे संकलन महामंडळात सनदी लेखापालांमार्फत वेळचेवेळी करण्यात येत असते. त्याचप्रमाणे महामंडळ व विभागीय कार्यालयांच्या लेख्यांमधील रकमांचा ताळमेळ सनदी लेखापालांमार्फत वेळचेवेळी घेण्यात येत असतो.

**(३) स्थिर मालमत्तेचे प्रत्यक्ष तपासणी करणेबाबत पद्धती-**

स्थिर मालमत्तेची वार्षिक तपासणी नियमितपणे विभागीय स्तरावर करण्यात येत असते. तथापी पुन:श्च वार्षिक तपासणी वेळेवर करणेबाबत सुचना मंडळ तसेच विभागीय कार्यालयांना देण्यात आलेली आहे. तपासणीचे अहवाल पुढील लेखा परिक्षणात सादर करण्यात येतील.

**(४) हत्यारे, सयंत्रे यांचे प्रत्यक्ष तपासणी करणेबाबत पद्धती-**

हत्यारे व सयंत्रांची वार्षिक तपासणी नियमितपणे विभागीय स्तरावर करण्यात येत असते. तथापी पुन:श्च वार्षिक तपासणी वेळेवर करणेबाबत सुचना मंडळ तसेच विभागीय कार्यालयांना देण्यात आलेली आहे. तपासणीचे अहवाल पुढील लेखा परिक्षणात सादर करण्यात येतील.

**(५) वैधानिक रकमांची वेळीच अदायगी करणेबाबत-**

निरंक

(एम. एम. गवई)

**कार्यकारी संचालक**
तापी पाटबंधारे विकास महामंडळ,
जळगाव

**व्यवस्थापकीय संचालक**
तापी पाटबंधारे विकास महामंडळ,
जळगाव

5/11